सूचना का अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९१८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०

क्र. मुमाआ-२०१५/प्र.क्र. १०९/०२ दिनांक : ०४/०९/२०१५.

**राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात प्राप्त होणारी अपिले/ तक्रारी दाखल करण्यासाठी कालमर्यादा विहित करण्याबाबत.**

**वाचा** : समक्रमांक दिनांक १०/१०/२०१३ व दि. ११/०२/२०१४ ची परिपत्रके.

**-: परिपत्रक :-**

राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात प्राप्त होणारी अपिले तसेच तक्रारी ह्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहित करण्यात आलेल्या कालमर्यादेपेक्षा अधिक कालावधीनंतर केलेली निदर्शनास आल्यानंतर अपिले/तक्रारी आयोगाच्या कार्यालयात दाखल करुन घेण्याची मर्यादा अनुक्रमे एक वर्ष व सहा महिन्यांच्या आत करण्याबाबत सूचना प्रसृत करण्यात आल्या होत्या.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) नुसार प्रथम अपिलावरील निर्णयाविरुध्दचे दुसरे अपिल यथास्थिती केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्यासाठी कालमर्यादा विहित करण्यात आली असून त्यानुसार द्वितीय अपील हे सदर निर्णयाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत दाखल करणे आवश्यक आहे. तसेच, अपीलकर्त्याला वेळेत अपील दाखल न करण्यास वाजवी कारण होते अशी यथास्थिती केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती **आयोगाची खात्री पटली** तर ९० दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याला अपील दाखल करुन घेता येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

३. अधिनियमातील वरील तरतूद विचारात घेऊन, द्वितीय अपील दाखल करण्यासाठी विहित करण्यात आलेली कालमर्यादा सदर अधिनियमाच्या कलम १८ खाली दाखल करण्यात येणाऱ्या तक्रारींसंदर्भात देखील लागू करण्याबाबत आयोगाने निर्णय घेतला असून यापुढे **आयोगाच्या कार्यालयात तक्रारी दाखल करुन घेण्याची मर्यादा** ज्या प्रकरणात आयोगाने निर्णय दिला आहे अशा प्रकरणांच्या बाबतीत निर्णय दिल्याच्या तारखेपासून ३ **महिन्यांवर आणण्यात येत आहे.** त्यापेक्षा अधिक कालावधीनंतर आयोगाकडे दाखल करण्यात येणाऱ्या तक्रारी कालबाह्य ठरत असल्याने सदर तक्रारी दाखल करुन घेतल्या जाणार नाहीत.

३. सदर परिपत्रक मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

04/9/15

(भ. बु. गावडे)
सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग

प्रत :
निवडनस्ती

E:\PHK २\TIME LIMIT FOR DISPOSAL OF APPEALS n COMPLAINTS (Recovered).docx